महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४३०/४६५
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: १०/एडीएम/ २०२२/ ९e                                                       दिनांक : 6 JAN 2023

प्रति,

**प्राचार्य/संचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या**
**सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/विद्यापीठ संचालित/ विनाअनुदानीत**
**तांत्रिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था**

विषय : आपल्या महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचे एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन:मुल्यांकन (NBA Reaccreditation) प्राप्त करून घेणेबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. इबीसी-२०१६/ प्र क्र २२१/ शिक्षण-१, दिनांक ३१.३.२०१६
२) आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/ शैक्ष.प्रति./ २९९८, दिनांक ५.८.२०१६
३) या संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१६/१२१०, दि. ०१.०९.२०१६
४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि ४, दि. ०७.१०.२०१७
५) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२(भाग-३)/तांशि ४, दि. ०७.०८.२०१८
६) शासन पत्र क्र. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/भाग-३/ तांशि ४, दि. २६.११.२०२०
७) शासन पत्र क्र. उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/भाग-३/ तांशि ४, दि. २३.०६.२०२१

प्रस्तूत विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शिखर संस्थांचे निर्देश व विविध शासन निर्णयास अनुसरून संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन: मुल्यांकन (NBA Reaccreditation) करण्याच्या सूचना या संचालनालयातर्फे वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरून काही संस्थांनी त्यांचे एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन:मुल्यांकन (NBA Reaccreditation) प्राप्त करुन घेतलेले असले तरी अशा संस्थांची संख्या अपेक्षेपेक्षा खूप कमी आहे. व-याचशा संस्थांनी त्यांचे एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन: मुल्यांकन (NBA Reaccreditation) प्राप्त करुन घेतलेले नाही, करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांचे एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन:मुल्यांकनाच्या (NBA Reaccreditation) आवश्यकतेबाबत खालील बाबीं पुनश्च आपले निदर्शनास आणण्यात येत आहेत.

१. देशाच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी तसेच वैश्विक पातळीवर अग्रेसर राहण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020) आपल्या देशाने अंगिकारले असून त्याची अंमलवजावणी सुरु आहे. उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करताना ते गुणवत्तेवरोवरच दर्जेदार व नाविन्यपूर्ण असणेही आवश्यक आहे. त्याकरीता संस्थांचे एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) असल्यास संस्था दर्जेदार असल्याचे अधोरेखीत होते.
२. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) प्राप्त करून घेण्याच्या सूचना तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिखर संस्था असलेल्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने वेळोवेळी दिलेल्या

आहेत. तसेच एन. बी. ए. मानांकन / मुल्यांकनाशिवाय विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ अनुज्ञेय नाही. परिणामी संस्थेची विकासात्मक वाढ होत नाही.

३. ज्या संस्थांचा एनबीए मानांकनाचा (NBA Accreditation) कालावधी संपला आहे, त्यांनी एनबीए पुन: मुल्यांकन (NBA Reaccreditation) सुध्दा होणे गरजेचे आहे. सर्व संस्थांनी त्यांचे अभ्यासक्रमाला त्या त्या वर्षी दर्जा मानांकन असल्याबद्दलची काळजी घेणे आवश्यक आहे. ज्या संस्थांनी त्यांच्या संस्थेतील अभ्यासक्रमांना एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन: मुल्यांकन (NBA Reaccreditation) प्राप्त करून घेतला असेल व त्या मानांकनाची वैधता संपुष्टात आली असेल तर त्या संस्थांनी त्या अभ्यासक्रमांना त्यापुढील Cycle मध्ये पुन:मुल्यांकन प्राप्त करून घेणे बंधनकारक व अनिवार्य आहे.

४. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि ४, दि. ०७.१०.२०१७ व उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२(भाग-३)/तांशि ४, दि. ०७.०८.२०१८ तसेच शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/भाग-३/ तांशि ४, दि. २३.०६.२०२१ अन्वये राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनाकरीता शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व त्यानंतर मुल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation) प्राप्त करून घेण्यासाठी पात्र ठरलेल्या संस्थांना त्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत संबंधित शिखर संस्थांकडे मानांकन प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक राहील, असे नमूद केलेले आहे.

५. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधील पोटकलम ४ नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्विकृती किंवा यथास्थिती पुनर्रअधिस्विकृती मिळण्यासाठी पात्र किंवा अपेक्षित असेल असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्विकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्विकृतीच्या आवश्यकतांची पुर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही" अशाप्रकारे तरतूर करण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांचे एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन: मुल्यांकन (NBA Reaccreditation) करून घेणे आवश्यक आहे.

नवीन शिक्षण धोरणामध्ये (NEP 2020) तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या धोरणामध्ये दर्जात्मक शिक्षण आणि दर्जेदार शैक्षणिक संस्थांना देण्यात आलेले प्राधान्य विचारात घेता संस्थांनी मूल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त करुन घेणे अत्यावश्यक आणि अपरिहार्य आहे. त्यासाठी आपल्या संस्थेतील एन.बी.ए. करीता पात्र अभ्यासक्रमांना एनबीए मूल्यांकन (NBA Accreditation) व एनबीए पुन: मुल्यांकन (NBA Reaccreditation) पुढील सहा महिन्यांत प्राप्त करुन घेण्यात यावे. अन्यथा संदर्भीन शासन पत्र / शासन निर्णयात नमूद केल्यानुसार शासन नियमानुसार व प्रचलित धोरणानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीस्तव सादर —

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

२. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे कार्यालय, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई

प्रत : माहिती व उचित कार्यवाहीसाठी-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व संस्थांच्या बैठका घेऊन त्यांना एनबीए मानांकन मिळविण्यासाठी प्रोत्साहीत करावे व याबाबतचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याचा अहवाल या संचालनालयास सादर करावा

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई

४. कार्यासन क्रमांक २, २अ, १७ व १८

5. कार्यासन क्रमांक १०, निवड नस्तीस